ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ४८ | पुणे, बुधवार, १९ जुलै, १९७२ | अंक १४

## आमच्या २ योजना आपले स्वप्न साकार करतील

### निश्चित काल ठेव योजना

ह्या योजनेत तुम्ही जितके पैसे दरमहा ठेवाल त्याच्या दुप्पट तुम्हाला परत मिळतील. मुलांचे शिक्षण, विमा हप्ता, सेवानिवृत्तीनंतर नियमित मिळकत इ. साठी या योजनेचा फायदा घ्या.
आपण दरमहा रु. १० अगर त्याच्या पटीत पैसे ठेवू शकता. १० रु. १२० महिने भरल्यास आपणास २४०० रु. परत मिळतील.

### संचित ठेव योजना

या योजनेत तुम्हाला तुमच्या संचित ठेवीवर व्याज देण्याऐवजीं त्याचा दरमहा हिशोब केल्याने तुमच्या बचतीत अधिक भर पडते, आणि या रकमेवर तुम्हाला व्याज मिळते.

मुदतीनंतर ठेवीबरोबरच व्याजावर व्याजही मिळते, सध्याच्या ठेवीपेक्षा ही योजना कितीतरी लाभदायक आहे.

१००० रुपये १८ महिने ठेवल्यास ११०० रुपये मिळतील; ६९ महिने ठेवल्यास १५०० रु. मिळतील.

**सविस्तर माहिती नजिकच्या महाराष्ट्र बँकेच्या कोणत्याही शाखेत मिळेल.**

## बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २

Pratibha 7120

### जमीनधारणेची राष्ट्रीय उत्पन्नाशी सांगड घाला

मसुरी येथे आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय ह्या विषयासंबंधी परिसंवाद भरविण्यात आला होता सध्या भारतात कमाल जमीनधारणेचा प्रश्न गाजत आहे. त्या विषयी परिसंवादात असे मत व्यक्त करण्यात आले की कमाल जमीनधारणा आणि राष्ट्रीय उत्पन्न ह्यांची सांगड घालण्यात यावी. त्याचप्रमाणे उत्पादकतेचाही ह्याच संदर्भात विचार करण्यात यावा. देशांत कमाल जमीनधारणेविषयी कायदे अमलात आल्यावर जी वरकड जमीन उपलब्ध होईल तिच्या वाटपाबद्दल परिसंवादात भिन्न मते व्यक्त करण्यात आली. शेतीतज्ज्ञांच्या मताने वरकड जमीन ज्या शेतकऱ्यांच्या जवळ आर्थिकदृष्ट्या न परवडणारी थोडी जमीन असेल त्यांना अधिक जमीन लागवडीसाठी देण्यात यावी, म्हणजे अशी शेती तोटयाची होणार नाही.

---

### उत्तर प्रदेशातील अभयारण्याचे आकर्षण

उत्तर प्रदेशात नैनितालच्या तराई भागात सुप्रसिद्ध जिमकॉर्बेट अभयारण्य आहे. जिम हा एक प्रसिद्ध इंग्रज शिकारी होता. त्याला प्राण्यांविषयी फार प्रेम असे. ह्या अभयारण्याचा विस्तार ५२५ चौ. किलोमीटरवर पसरलेला आहे. अरण्यातील जीवनाचा अनुभव घेण्यासाठी व तेथील पशुपक्ष्यांचे जवळून अवलोकन करण्यासाठी दरसाल अनेक लोक तेथील विश्रामस्थानात जातात. त्यातील कित्येक झाडावर असतात. १९७० मध्ये अभयारण्याला ३ हजार हौशी प्रवाशांनी भेट दिली होती. गेल्या वर्षी ६ हजार प्रवासी आले होते. उत्तर प्रदेशात लहान-मोठी अशी ११ अभयारण्ये आहेत. उंच प्रदेशातील प्राण्यांसाठी आणखीही अभयारण्ये स्थापन करण्यात येत आहेत.

---

### कृमिकीटकांचा नाश करण्यास लसूण उपयुक्त

लसूण ह्या पदार्थाला उग्र वास येत असला तरी त्याला माणसांच्या आहारात स्थान आहे. भाभा अणुविज्ञान केंद्रातील दोघा जीवशास्त्रज्ञांनी आता असा शोध लावला आहे की त्याचा वापर डी. डी. टी. ऐवजी करता येईल. पिकांवरील कृमिकीटक नष्ट करण्याच्या कामी लसणाच्या पातीच्या अर्काचा फार चांगला उपयोग होतो. लसणाच्या जंतुघ्न गुणधर्मावर हे शास्त्रज्ञ दोन वर्षे प्रयोग करीत होते. त्याच्या अगदी थोड्याशा अर्कानि सुद्धा डासांच्या आळ्या नाहीशा होतात असे आढळून आले आहे. ह्याचा अर्थ असा की हिंवतापाच्या उद्भवावर व विस्तारावर लसणापासून तयार केलेल्या तेलाचा चांगला उपयोग होईल. अशा तेलाचे उत्पादन व्यापारी तत्त्वावर करता येईल असा भरवसा त्यांना वाटत आहे.

---

### निकोसियामधील रस्त्याला महात्मा गांधींचे नाव

निकोसियामधील पार्लमेंटच्या शेजारील एक मोठ्या रस्त्याला महात्मा गांधींचे नाव देण्यात आले आहे. नामकरण समारंभ राष्ट्रपती गिरी ह्यांच्या हस्ते १० जुलै रोजी झाला.


तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी

दूरध्वनी : मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१ : २६०३०६ नं.२ : २९०००६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | ३०-६-१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३२ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

डॉ. वा. पु. श्रीश्रीमाळ
कार्यकारी संचालक

श्री. नि. श्री. सपकाळ, एम्. ए., एलएल. बी., अध्यक्ष

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १९ जुलै, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## अमेरिकेची मदत बंद झाली तरी प्रगति थांबणार नाही

परदेशांच्या आर्थिक मदतीशिवाय भारत आपल्या अर्थव्यवस्थेचा विकास करू शकेल असा भरवसा निर्यातमंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम् ह्यांनी व्यक्त केला आहे. श्रीनगर येथे वार्ताहरांशी ह्या विषयी बोलताना ते म्हणाले की अमेरिकेने भारताला देण्यात यावयाची मदत बंद केली तरीही भारताच्या आर्थिक प्रगतीला कोणत्याच प्रकारे अडथळा उत्पन्न होणार नाही. प्रगतीचा गाडा अडखळण्याचा प्रसंग आलाच तर भारताजवळ अडचणीतून बाहेर पडण्याइतकी डॉलर्सची गंगाजळी आहे. तथापि अमेरिकेने भारताला ८·७ कोटी डॉलर्स मदत देण्यास बांधून घेतलेले आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सध्या भारताला जी परदेशीय मदत मिळत आहे त्याच्या ५० टक्के एवढी ही मदत आहे. भारताच्या परदेशीय व्यापारातील प्रतिकूल तफावत ५० कोटी डॉलर्सच्या आसपास आहे. व्याजासकट कर्जाची परतफेड करण्यासाठी ६५ कोटी डॉलर्स लागतील. येत्या पाच वर्षात आर्थिक क्षेत्रात भारत नवीन वळण घेईल. भारताला अमेरिकेकडून मुख्यत: रासायनिक खते, कापूस, पोलाद आणि काही प्रकारची भारी यंत्रसामग्री आयात करावी लागते. ह्या वस्तूंबाबत स्वयंपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठी जोराचे प्रयत्न करण्यात येत आहेत. अमेरिकेची मदत बंद झाल्यास जे प्रश्न उत्पन्न होतील ते सोडविण्यासाठी भारत सरकारने अनेक टप्प्यांचा कार्यक्रम तयार केला आहे, त्याचा इष्ट परिणाम होईल.

---

## दारिद्र्य हा विकासाच्या मार्गातील अडसर

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक उपसंघटनेची बैठक जिनिव्हा येथे भरली होती. ती चार आठवडे चालणार आहे. बैठकीचे उद्घाटन करताना संयुक्त राष्ट्र संघटनेचे सरचिटणीस डॉ. कर्ट वाल्डहिम म्हणाले की सध्याचे जगाचे चित्र अस्वस्थ करणारे आहे. अनेक देशांतून दारिद्र्याचे थैमान चालू आहे आणि लक्षावधी लोकांना काम नाही; आणि त्यामुळेच त्या देशांची आर्थिक प्रगती अडून राहिली आहे. दारिद्र्य, अनारोग्य, शिक्षणाचा अभाव आणि बेकारी ह्या चार मोठ्या समस्या असून त्यांची सोडवणूक करण्यासाठी त्यावर सबळ व थेट उपाय करण्यात आले पाहिजेत. ग्रामीण भागांतील लोकांच्या जीवनात सुधारणा करण्यात आली पाहिजे. अशी सुधारणा झाली तरच खेड्यांतून शहरांत येणाऱ्या लोकांचा ओघ काही तरी मंदावेल. ही गोष्ट लक्षात घेऊन विकासाच्या कामाची आखणी करण्यात आली पाहिजे विकासाच्या अगदी खालच्या पायरीवर असणाऱ्या देशांना विकसित देशात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांना खास आर्थिक कार्यक्रम आखावे लागतील. असे कार्यक्रम अमलात आणले गेले तरच ह्या देशांना जगाच्या अर्थव्यवस्थेची भरभराट घडवून आणण्याच्या कामी अधिक कामगिरी करता येईल. आंतरराष्ट्रीय व्यापाराची नवी घडी बसविताना आणि चलनाची नवीन पद्धती स्वीकारताना औद्योगिकदृष्ट्या विकास पावलेल्या देशांचाच फक्त विचार करून चालणार नाही.

---

## बल्गेरिआच्या अर्थव्यवस्थेचे अनुकरण करा

खासदार श्री. विठ्ठलराव गाडगीळ पूर्व युरोपातील बल्गेरिआ ह्या देशाला भेट देऊन आले. त्या देशाच्या अर्थव्यवस्थेची माहिती सांगताना ते म्हणाले की भारताने बल्गेरिआच्या अर्थव्यवस्थेचे अनुकरण करण्यासारखे आहे. तेथे जरूरीच्या वस्तूंच्या किमती कमी ठेवण्यात आल्या असून चैनीच्या वस्तूंच्या किमती खूपच चढत्या पातळीवर ठेवण्यात आल्या आहेत. नित्योपयोगी वस्तूंच्या किमती कमी ठेवण्यासाठी तेथील सरकार आर्थिक मदत देते. भारताने 'गरिबी हटाव' हे ध्येय ठेवले आहे. प्रत्येक गरीब माणसाला रेशन कार्डावर १ रुपया किलोने धान्य देण्यात आले, एका मीटरला १ रुपया ह्या दराने प्रत्येकाला दर वर्षाला १६ मीटर कापड देण्यात आले आणि दरमहा १० रुपये भाड्याची राहती जागा देण्यात आली म्हणजे हे ध्येय गाठताना चैनीच्या वस्तूंच्या किमती चढत्या राहिल्या तरी हरकत नाही. नियोजन समितीने आर्थिक नियोजन करताना ही तत्त्वे डोळ्यासमोर ठेवून भारताच्या अर्थव्यवस्थेचे पुनर्घटन कसे करता येईल त्याचा विचार करावा. बल्गेरिआत काही उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आलेले असले तरी पुढाकार घेण्याच्या वृत्तीला मारून टाकण्यात आलेले नाही. छोटे व्यापारी आणि कुशल कामगार ह्यांना आपले धंदे चालविण्यास मनाई नाही. तेथे सरकारी मालकीची मोठी शेते स्थापन करण्याऐवजी सहकारी पद्धतीने चालविण्यात येणाऱ्या शेतीसंघटना स्थापन करण्याकडे अधिक कल दिसतो.

---

## उद्योगपती हे गरिबीचे शत्रू पण गरिबांचे हितकर्ते आहेत

(लेखक : श्री. वसंतराव वैद्य)

सर्व मालमत्ता व उद्योगधंदे सरकारी किंवा सार्वजनिक संस्थेच्या मालकीचे असावेत व सर्वांचे उत्पन्न समान असावे अशी समाजवादाची व्यापक भूमिका आहे. हे ध्येय साधण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी उत्कट जिव्हाळ्याचे या दिशेने अटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. गरीब व श्रीमंत यांमधील अंतर यासाठीच कमी नव्हे, नष्ट झाले पाहिजे. समाजातील आर्थिक दैन्य दूर करण्यासाठी राष्ट्रीय उत्पादन वाढवणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, व हे कार्य भारतातील मोठे खाजगी उद्योगधंदे गेली अनेक वर्षे नेकीने करत आहेत. राष्ट्राच्या आर्थिक उभारणीमध्ये या मोठमोठ्या उद्योगपतींचा सिंहाचा वाटा आहे. या ऐतिहासिक सत्याचा विसर अलीकडे पडू लागला आहे असे वाटते व हा विसर पडावा यासाठी योजनाबद्ध प्रचार समाजवादी पुरस्कर्त्यांकडून केला जात आहे. यामुळे समाजोन्नतीस हितकारक असणाऱ्या घटकाबद्दल निष्कारण प्रतिकूल मत बनविण्यात येत आहे. "गरिबी हटाव" ही घोषणा राष्ट्रीय उत्पादनवाढीच्या अभावी नुसती घोषणाच राहील. उद्योगपतींचे हे हरपलेले श्रेय लक्षात न घेतले गेल्यामुळे गरिबीकडे सर्वांगीण सहानुभूती व श्रीमंतांकडे तिरस्करणीय उपेक्षा असा प्रकार सुरू झाला आहे, हे अनिष्ट व अन्यायकारक आहे. खाजगी उद्योगधंदे समाजवादी वाटचालीच्या आड मुळीच न येता ते ती वाटचाल अधिक जलद करतात याची जाणीव ठेवली पाहिजे. जपानमध्ये कोणत्याही राष्ट्रीय महत्त्वाच्या योजनांमध्ये तेथील श्रेष्ठ उद्योगपतींचे मत व सल्ला घेतला जातो. खाजगी उद्योगधंद्यांवरील वाजवी नियंत्रणाने राष्ट्रीय उत्पादनामध्ये अग्रस्थान जपानने मिळवून दाखवले आहे. यासाठी समाजवादी रचना निर्माण करण्यामध्ये उद्योगपतींनी केलेल्या व सध्या करीत असलेल्या राष्ट्रीय कार्याची उपेक्षा हितावह न ठरता समाजवादी विचारास हानिकारकच ठरेल यात संशय नाही. उद्योगपती हे गरिबीचे शत्रू असले तरी गरिबांचे हितकर्ते आहेत. कारण राष्ट्रीय उत्पादन वाढवून गरिबी दूर करण्याचे महत्त्वाचे कार्य तेच करीत असतात. गरिबांचे शोषण न करता ते पोषण करतात हे विसरून कसे चालेल?



श्री. वसंतराव वैद्य

—रुद्रवाणी, २० - ६ - १९७२

## उत्पन्नापेक्षा विनियोगावरील कर उपयुक्त

देशाच्या अर्थव्यवस्थेत काळा पैसा मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घालत असल्याने तो उघडकीस आणून आर्थिक व्यवहारातील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याबद्दल लोकांचे आणि सरकारचे एकमत आहे परंतु हा पैसा उघडकीस आणण्याचे सुलभ मार्ग सापडत नाहीत. वांच्छू कमिटीने ह्या प्रश्नांबद्दल काही शिफारशी केल्या असून त्यावर सरकारतर्फे विचार चालू आहे. वांच्छू कमिटीचे एक सभासद श्री. एम. पी. चितळे ह्यांनी मुंबई येथे एका चर्चेत आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मताने काळा पैसा उघडकीस आणण्याच्या कामी त्यापासून निर्माण होणाऱ्या धोक्याला काबूत ठेवण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरे होणार नाहीत. त्यासाठी लोकांनीही स्वतःच्या प्रेरणेने संघटित प्रयत्न केले पाहिजेत. सध्या प्राप्तिकराच्या आकारणीत भर देण्यात येतो तो मिळत असलेल्या उत्पन्नावर; पण अर्जित उत्पन्नावर कराचा भार लावण्यापेक्षा त्या उत्पन्नाचा कसा विनियोग करण्यात येतो ह्यावर कराची आकारणी करण्यात यावी. असे केल्याने जे लोक श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यासाठी भपकेबाज खर्च करतात त्यांच्यावर कराची वक्रदृष्टी वळेल. सध्या परिस्थिती अशी आहे की धंदेवाल्यांना आपल्या उत्पन्नापैकी काही भाग प्राप्तिकर अधिकाऱ्यांपासून लपविण्याशिवाय मार्गच राहिलेला नाही. नाहीतर त्यांना धंदा बंद करावा लागेल. कारण अनेक अधिकाऱ्यांना लाच दिल्याशिवाय भागतच नाही. शिवाय इतरही अनेक प्रकारचे खर्च त्यांना करावे लागतात. अशा प्रकारचे खर्च कायद्याच्या चौकटीत दाखविता येण्यासारखे नसतात.

## राज्यांचे ओव्हरड्राफ्ट एका महिन्यात ४०% ने वाढले

राज्यांनी रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या ओव्हरड्राफ्टसची रक्कम १ एप्रिल, १९७२ रोजी ४६२ कोटी रु. होती, ती २९ एप्रिल रोजी ६५० कोटी रु. वर गेली. १ मे नंतर अनधिकृत ओव्हरड्राफ्टना परवानगी मिळणार नाही, असे केंद्र सरकारने जाहीर केले होते. त्या तारखेपूर्वी जास्तीत जास्त ओव्हरड्राफ्ट घेण्याचे राज्यांनी ठरविलेले दिसते. १९७२-७३ मध्ये ओव्हरड्राफ्ट १५% ने कमी करण्याचे राज्य सरकारांनी मान्य केले होते, आणि चलनवाढ त्यामुळे कमी होईल अशी अपेक्षा होती. कोणत्याही राज्याने अनधिकृत ओव्हरड्राफ्टची रक्कम सात दिवसात भरली पाहिजे. नाहीतर त्याचे चेक पास केले जाणार नाहीत, असे केंद्र सरकारने आता ठरविले आहे.

## पर्शिअन आणि अरेबिक टेलिप्रिंटर

मद्रास येथील सरकारी टेलिप्रिंटरचा कारखाना, पर्शियन की बोर्ड असणारे टेलिप्रिंटर इराणकडे निर्गत करणार आहे. ह्यापूर्वी अरेबिक टेलिप्रिंटर कंपनीने निर्गत केले होते. चालू वर्षी एकूण १२० टेलिप्रिंटर निर्गत होतील; गेल्या वर्षी ८० ची निर्गत झाली होती.

# काळाची पावले ओळखा

## गतिमान कालचक्राशी एकरूप होणार, का बाहेर फेकले जाणार ?

लेखक :—सु. वि. मेंहदळे, बी. ई., एम. बी. ए.

'कालचक्र हे अविरत फिरत असते. सकाळ, दुपार, सायंकाळ, रात्र, पुन्हा सकाळ हे काळाचे चाक वर्षानुवर्षे सांजसकाळ फिरत आले आहे आणि असेच फिरत राहणार आहे. कधीपर्यंत ?— जगाच्या अंतापर्यंत !' ही कल्पना विचारवंत नित्य नव्या स्वरूपात मांडीत आले आहेत. काही परकीय साहित्यिकांनी कल्पनेनें हे चक्र जलद फिरवून इ. स. २००० अथवा त्यापुढील काळात कशा तऱ्हेचे समाजजीवन असू शकेल याचे अंदाज आपल्या कादंबऱ्यांतून मांडले आहेत. हे वर्णन चमत्कृतिपूर्ण व मनोरंजक तर आहेच पण त्याशिवाय ते संभवनीयही वाटते. कालचक्र हे सतत फिरणारे भव्य चाक आहे असे गृहीत धरले तर या चाकाच्या गतीने जे चाकाबरोबर फिरू शकतात तेच या जगात उरतात, जे बाहेर फेकले जातात ते संपतात. प्रत्येक व्यक्ती आपले या चाकाच्या आऱ्यावरील स्थान संभाळण्याचा प्रयत्न करीत असते व शक्यतोवर या चाकाच्या केंद्रबिंदूकडे सरकण्याचा प्रयत्न करीत असते पण हे चाक स्वतःच्या गतीतून निर्माण होणारे पदार्थ दूर फेकणाऱ्या शक्तीने व्यक्तींना दूर लोटण्यास पाहात असते. ह्या सेंट्रिफ्यूगल शक्तीला विरोध करून आपली जागा बळकट करणे हे एक अवघड काम आहे. त्यात बरीचशी शक्ती कामी येते.

या कालचक्राचा व्यक्तीप्रमाणे राष्ट्राच्या जीवनावरही फार परिणाम होत असतो. जगाच्या इतिहासाकडे पाहिले असता अनेक राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय दर्जाचे नेते आज विस्मृतीत गेले आहेत. तसेच अनेकांच्या गाडलेल्या स्मृतींना पुनरुज्जीवन मिळत आहे. स्टालिनचे कारकीर्दीत लेनिनस्मृती गाडण्याचा प्रयत्न झाला व त्यानंतर ताबडतोब त्याच स्मृतींना उजाळा देण्यात आला. हा सर्व चमत्कार इतक्या अल्पावधीत झाला की जगातील इतर राष्ट्रेही स्तिमित झाली.

राष्ट्राच्या नेतृत्वाची गरजही नेहमीसारखी नसते. काळाबरोबर तीही बदलत असते. स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्थानात ज्या नेतृत्वाची अपेक्षा होती तसे चळवळे किंवा बंडखोर नेतृत्व स्वातंत्र्यानंतरही आवश्यक असेल असे नाही. युद्धकाळात जे नेते हवे असतात ते शांततेच्या काळात मान्य असतीलच असे नाही. त्यामुळे राजकारण करणाऱ्यांना काळाची गरज ध्यानात घेऊनच आपले पवित्रे आखावे लागतात. प्रसंगी पक्ष व धोरणे बदलावी लागतात, हा दोष त्यांचा नसून तो बदलत्या काळाचा महिमा असतो. कालगतीचा व स्वतःचा सांधा सांभाळतांना बरीच कसरत करावी लागते व त्यात काही हेकेखोर पुढारी कोलमडून पडतात. ज्यांचे पवित्रे कालगतीच्या विरुद्ध दिशेने पडतात ते तेव्हाच बाहेर फेकले जातात. तसेच ज्यांचे पवित्रे वा कृती काळ बदलण्याच्या फार अगोदरच पडतात ते अव्यवहारी म्हणून हेटाळले जातात. त्यांच्याकडे कुत्सित नजरेने पाहिले जाते; ते चेष्टेचा विषय बनतात. 'हिंदी चिनी भाई भाई' च्या जमान्यात जर कोणी द्रष्टा चीनपासूनही भारताला धोका संभवतो व तेथील लष्करी तयारी लक्षात घेऊन भारतानेही आपल्या ईशान्य सीमेवर शस्त्रसज्ज राहावे असे सांगू लागला असता तर त्याचे हसे झाले असते. कालगतीतील बदलाचे त्याचे ज्ञान तो अप्रसिद्ध पुढारी असेल तर एक उपहासाचा विषय ठरतो. 'सब भूमि गोपालकी', असे म्हणून प्रत्येक जमीनदाराकडे त्याच्या जमिनीचा पाचवा हिस्सा खुषीने मागणारे विनोबा त्या क्षेत्रात अप्रिय ठरतात. पण कालांतराने जेव्हा सरकारीरीत्या जमीनधारणेवर मर्यादा (सीलिंग) आणली जाते तेव्हा हाच वर्ग त्या ठरावाचे समर्थन करतो. काळाबरोबरच न्याय–अन्यायाच्या गोष्टीही बदलत असतात व राज्यकर्त्या व्यक्तींबरोबर राष्ट्राचे आदर्शही बदलत असतात. कालपर्यंत राष्ट्राचा नेता व लाडका असलेला याह्याखान आज त्याच राष्ट्राचा शत्रू मानला जातो व विरोधी पक्षाचा पुढारी म्हणून वावरणारे भुट्टो राष्ट्राध्यक्ष म्हणून शाही इतमामाने भारताच्या पंतप्रधानांशी देशाचे भवितव्य ठरवणाऱ्या वाटाघाटी करून जातात. आपल्याकडेही अनेक विरोधी पक्षीय मंडळी आज राज्यकर्त्या पक्षात अधिकाराच्या जागेवर बसून सरकारी धोरणाचे समर्थन करीत आहेत ते या कालमहिम्यामुळेच. काळ निराळा असता तर बाळ गंगाधर टिळक हे महान गणिती व संस्कृत पंडित झाले असते असे म्हटले जाते पण मग ते 'लोकमान्य' झाले असते का ?

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातही काळाप्रमाणे लहान मोठे बदल घडत असतात. प्रत्येक व्यक्तीचा कर्तबगारीचा म्हणून काळ असतो. शिवाजी महाराज, माधवराव पेशवे, ज्ञानेश्वर महाराज, वगैरे व्यक्ती त्यांच्या अल्पवयातच कर्तबगार ठरल्या, पण सर्व सामान्य माणसांचा इतरांवर प्रभाव हा वयाची तिशी ओलांडल्यावर पडतो. या काळात त्यांची प्रकृती व विचारशक्ती चांगली प्रगत झालेली असते. कोणत्याही साहसप्रसंगी त्यांना प्रकृती व मनोवृत्तीची चांगली साथ मिळू शकते. स्वत्व, स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा वगैरे गुण या काळातच वाढीस लागतात व माणूस कार्यप्रवण होतो. कालचक्राच्या फेऱ्यात स्वतःला झोकून देऊन आयुष्य गतीमान करण्याची इच्छा या काळातच प्रबल असते. ज्यांना काळगती अनुकूल मिळते त्यांचे लौकिक यश वाढते. जे हेतुपुरस्सर काळगतीशी टक्कर देतात, आपले सामर्थ्य पणास लावतात ते जिंकले तर अलौकिक ठरतात व हरले तर त्यांचे हाल कुत्रा खात नाही. वयाचे तीस ते पन्नास वर्षं हा काळ सर्व साधारणपणे माणसाच्या कर्तबगारीचा काळ असतो. त्यानंतर त्या माणसाच्या अनुभवाचा फायदा घेता येतो पण प्रत्यक्ष कार्यात वा नवीन साहसात ती व्यक्ती फारशी

उपयोगी नसते. त्यामुळे त्यांना सल्लागार म्हणून नेमण्यात येते. पन्नाशीनंतरही कर्तबगारी वाढवणारी माणसे असामान्य म्हटली पाहिजेत. पूर्वायुष्यात यशस्वी ठरलेली पण अधिक महत्त्वाकांक्षा असलेली माणसेही नेटाने परिस्थितीवर मात करण्यासाठी झगडत असतात. त्यांची मनोवृत्ती व प्रकृती वयाचे बंधन न पाळणारी झालेली असते. त्यांचा आत्मविश्वास दांडगा असल्याने ते प्रयत्नशील राहतात. पण या वेळीही त्यांना वाढत्या वयाचे व काळाचे धक्के मधून मधून जाणवत असतातच. आपण आहोत त्यापेक्षा अधिक उत्साही व तरुण आहोत हे भासविण्याचा त्यांचा प्रयत्न लपत नाही. निसर्गनियमाप्रमाणे कालबाह्य व त्यामुळे गतिबाह्य व्हायला ते तयार नसतात. निसर्गाला प्रसंगी आव्हान देऊन ते स्वत:चे महत्त्व वाढविण्यासाठी अधिक परिश्रम घेत राहतात व त्यामुळे अशा व्यक्तींची कालज्योत हृदयविकारासारख्या झटक्याने अचानक मालवण्याची बरीच भीती असते.

सेवानिवृत्त वरिष्ठ सरकारी अधिकारी किंवा लष्करी अधिकारी यांचे सेवानिवृत्तीनंतरचे जीवन ते कालबाह्य,प्रवाहबाह्य झाल्यामुळेच बरेचदा कीव करण्याजोगे होते. या काळात बहुसंख्य अधिकारी हतबल होतात, त्यांचे मनोधैर्य दुर्बळ होते व क्वचित प्रसंगी लाचारीचे जीवन जगण्यासही ते प्रवृत्त होतात. त्यांचे पूर्वीचे शान, दरारा, वैभव आठवल्यास त्यांचे आजचे जीवन फारच केविलवाणे वाटते. या काळात बदलत्या काळाशी फारच थोड्या व्यक्तींना सांधा जोडता येतो.

आपले अस्तित्व, आपले नाव, आपली किर्ती आणि आपले अनुयायी टिकवण्याची वा वाढवण्याची जबर इच्छा व्यक्तींना उतारवयातच अधिक होते. कालमानाप्रमाणे त्यांची गती मंद झालेली असते व त्यामुळे निदान आपण स्मृतिबाह्य होऊ नये म्हणून या व्यक्ती धडपड करू लागतात. देणग्या देऊन स्वत:चे गावात देवालये बांधणे, शाळेला आपले नाव देणे, धर्मार्थ कार्य करणाऱ्या संस्था स्थापन करणे व त्यावर विश्वस्त म्हणून राहणे, लायन्स, रोटरी इ. क्लबांचे सभासद होणे अशा कृती व्यक्ती ज्या काळात करतात त्या वेळी आपण स्मृतिबाह्य होण्याची भीती अंतर्यामी त्यांना वाटत असावी. परदेशात स्वत:साठी दहनभूमीतही योग्य जागी योग्य तऱ्हेचे स्वत:चे स्मारक करण्यासाठी ॲडव्हान्स देऊन तरतूद केली जाते.

ज्याप्रमाणे व्यक्तींच्या आयुष्यात चढउताराचा काळ असतो त्याप्रमाणे आपण वापरीत असलेल्या वस्तूंच्या बाबतीतही घडते. वस्तूही कालबाह्य ठरू शकतात. वस्तू जुनी झाली अथवा निरुपयोगी झाली म्हणून फेकून देणे हे अपेक्षितच आहे पण एखादी वस्तू वापरण्यायोग्य असूनही केवळ तिचा वापर कालबाह्य ठरल्यामुळे टाकून दिली जाते. जुन्या काळी प्रवासाला निघताना बरोबर न्यावयाची वळकटी, ट्रंक, फिरकीचा पितळी तांब्या, फराळाचा डबा, वगैरे सामान आज नवे असले तरीही प्रवासाला निरुपयोगी ठरेल. जेटने प्रवास करायचा तर यांपैकी कोणतीही वस्तू बरोबर नेली जाणार नाही. त्या प्रवासाला शोभेल असेच सामान बरोबर घ्यावे लागेल. पडवी, अंगण, माजघर असलेल्या जुन्या वाड्यात आपल्या वाडवडिलांनी केवळ कौतुकाने पुढील पिढीला उपयोगी पडेल म्हणून जमवलेले सामान आमच्या आजच्या पिढीला आवडणार नाही व चुकून आवडलेच तर आमच्या नव्या 'ब्लॉक' मध्ये ते सामावणारही नाही. नित्योपयोगाच्या वस्तूंचे आयुष्य अतिशय मर्यादित असावे. आज आवश्यक वाटणारी वस्तू थोड्याच दिवसांत कालबाह्य ठरेल. घरात दूध हवे म्हणून म्हैस ठेवायची म्हटले तर गोठा बांधायला जागा नसेल पण तीच मोटर घेतली तर तिच्यासाठी चांगले गॅरेज बांधले जाईल किंवा भाड्याने घेतले जाईल; कारण ती काळाची गरज आहे. जुन्या घरातील मौल्यवान वस्तू कालबाह्य ठरल्याने आज मोडीत काढल्या जात आहेत. चांदीची ताटे, वाट्या, भांडी, चंदनी पाट, वगैरे वस्तू असलेल्या कुटुंबात याच वस्तू विकून लाकडाचे टेबल, खुर्च्या व काचेच्या डिशेस वगैरे हलके पण आधुनिक भासणारे सामान आणले जाते ते दारिद्र्याचे लक्षण म्हणून नव्हे तर बदलत्या काळाशी सांधा जोडण्याचा प्रयत्न म्हणूनच.

वस्तूंच्या वापरातील बदल हे मुख्यत: बऱ्या-वाईट, योग्य-अयोग्य, सोपे-कठीण या विषयींच्या माणसांच्या संकेतानुसार घडत असतात. माणसाचे मन ही सर्वांत जलद धावणारी वस्तू आहे. स्थळकाळाच्या मर्यादेपलीकडेही मन पोहोचू शकते व तेही निमिषार्धात. यामुळेच फॅशन, सभ्यता, रीतीरिवाज यांच्या कल्पना बदलू शकतात. फार काय अश्लीलतेची व्याख्याही नित्य बदलत आली आहे. आदर्श कुटुंबाचा आकार किती असावा हेही काळ ठरवत आला आहे. आज 'दो या तीन' मुले म्हणजे डोक्यावरून पाणी मानले जात आहे. ज्या घरांत सुधारणेच्या दृष्टीने विधवांच्या केशवपनास विरोध झाला त्याच घरांतील मुली व सुना हौसेने नियमित आपले केस सलूनमध्ये जाऊन कापून घेत आहेत. पुरुषांसाठी प्रसिद्ध असलेली कापडे स्त्रिया पसंत करीत आहेत व त्यांच्यासाठी म्हणून खास निर्माण केलेली विविधरंगी कापडे पुरुषांचा पोषाख सजवीत आहेत. पुरुषी रुंद घड्याळे स्त्रियांच्या नाजुक मनगटांवर शोभत आहेत. थोड्याच दिवसांत स्त्रीपुरुषांच्या अंगावरच्या कपड्यांच्या बाबतीतला भेद नष्ट होऊन ठराविक मापाचा वा घेराचा कपडा तो व ती दोघेही वापरू शकतील. प्रत्येक धंद्यास या बदलत्या काळाचा बरावाईट परिणाम भोगावा लागत आहे. महागाई वाढताच दर वाढवणारे सलूनवाले सध्या गप्प आहेत कारण अधिक दर वाढले आणि आहे ते गिऱ्हाईकही कमी झाले तर काय घ्या ही भीती त्यांना पडली असेल. वाढत्या वस्तींबरोबर ही दुकानेही पूर्वीसारखी वाढत नाहीत. रेडिमेड कपड्यांची उद्या फॅशन वाढली तर अनेक स्मार्ट टेलरही अडगळीत पडतील. आपल्या मालाचे गिऱ्हाईक टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी कित्येक व्यापारी कंपन्या

आटोकाट प्रयत्न करीत असतात. गिऱ्हाइकांवर ज्यांचा प्रभाव पडेल अशा नटनट्या, मॉडेल्स, आकर्षक जाहिराती, प्रचारपद्धती यांचा उपयोग करून आपण विकत असलेल्या वस्तू कालास अनुसरून उपयुक्त आहेत हे भासविण्याचा प्रयत्न या कंपन्या करीत असतात. नाहीतर आवश्यक वस्तूंचाही तुटवडा असलेल्या आपल्या देशात आयात केलेल्या कागदावरती एवढ्या मोठ्या जाहिराती पाहायला लागल्या नसत्या. आपला माल कालबाह्य नाही हे गिऱ्हाइकांच्या मनावर बिंबवण्यासाठी त्याचे आवरण बदलून त्याला 'सुपर', 'न्यू', 'प्लस', 'नया' अशी विशेषणे लावून तो विकण्याची स्पर्धा चालू आहे. जुनी आयुर्वेदीय औषधेही बाटलीऐवजी ट्यूब, फॉईल पॅकिंग वगैरे आवरणात भरून विकली जातात व त्यांचा बाजारातील खप टिकवला जातो.

आज व्यापारी व उत्पादक संस्थांना खरी गरज भासू लागली आहे ती २ वर्षांनंतर, ५ वर्षांनंतर, १० वर्षांनंतर बाजार कसा असेल व कोणत्या वस्तू नव्या येतील हे सांगणाऱ्या व्यवहारी ज्योतिषांचा, 'मार्केटिंग रिसर्च' किंवा विक्रीला आवश्यक संशोधन करणाऱ्या संशोधकांचा. दुर्दैवाने बहुसंख्य व्यापारी व कारखानदार हे गुंतवलेल्या भांडवलावर आवश्यक तो नफा ताबडतोब कसा मिळेल या विवंचनेत सापडले आहेत व भावी काळावर नजर ठेऊन आपल्या उत्पादनात सुधारणा घडवून आणण्याचे त्यांचे प्रयत्न कमी पडत आहेत. मोटारगाड्यांच्या इंधनाच्या धुराने हवा प्रदूषणाचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे व त्या दृष्टीने काही सुधारणा घडवून आणाव्या हे क्वचितच एखाद्या मोटार-उत्पादकाला आवश्यक वाटते. उद्या अमेरिकेच्या जनरल मोटरने बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात आणल्या की या कंपन्यांच्या धंद्यावर काय विपरीत परिणाम होतील ही विचार करण्यासारखी बाब आहे. याउलट जर उद्या कोणी हायवेज हेच सतत सरकते ठेवण्याची काही योजना काढली तर गाड्यांचा धंदाच बसेल. जो तो जवळच्या हायवेपर्यंत येऊन तिथे रेल्वेत बसतात त्याप्रमाणे हायवेवर आखलेल्या जागी स्वार होईल व हा पथ थांबताच आवश्यक ठिकाणी हायवेच्या बाहेर उतरू शकेल. आज जरी हे मनोराज्य वाटले तरी उद्या हे शक्यतेच्या टप्प्यातही येऊ शकेल. कदाचित दूरवाणी व दूरचित्र लहरींच्या साहाय्याने माणसे एका ठिकाणाहूनच आपले सर्व व्यवहार उरकू शकतील. प्रवास करण्याची फारशी जरुरीही राहणार नाही. याचप्रमाणे खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करण्याची स्वस्त पद्धत अमलात आली तर धरणे बांधून, पावसाचे पाणी अडवून, मोठाले नळ टाकून मुंबईसारख्या ठिकाणी पाणी आणण्याची खटपट बंद पडेल व त्या कामाचे तज्ज्ञ व यंत्रसामग्री कालबाह्य होण्याचे संकट उभे राहील.

जर उद्या रासायनिक चहा, कॉफी, साखर वापरात आली तर भारत, सिलोन, क्युबा, मॉरिशस यासारख्या देशांवर आर्थिक गंडांतर कोसळेल. याऐवजी जरी गिऱ्हाइकांनीही या वस्तूंचा वापरच कालबाह्य ठरविला तरीही असे संकट येऊ शकेल. भावी बाजाराचे अंदाज अचूक वर्तवणे हे धंद्याच्या यशाचे गमक आहे. वायदेबाजारातही या अंदाजांच्या अचूकपणावरच रंकाचे राव व रावाचे रंक होत असतात. भावी काळ जितका अनिश्चित तितका धंद्यात झटपट यश मिळवायला चांगला, मात्र त्या काळाचा अंदाज शक्य तितका अचूक असायला हवा.

---

### सारस्वत को. बँकेच्या ठेवी ९·६० क्र. कोटींवर

सारस्वत को. बँकेकडील ठेवी १९७१-७२ मध्ये ७·६९ कोटी रु. वरून ९·६० कोटी रु. वर गेल्या. निव्वळ नफा ४·२० लक्ष रु. वरून ७·१२ लक्ष रु. वर गेला. कर्जे ४·७२ कोटी रु. वरून ६ कोटी रु. वर गेली. ९% डिव्हिडंड कायम आहे. (कायद्याप्रमाणे जास्त देताच येत नाही.) बँकेच्या शाखांत दोन शाखांची भर पडून त्यांची संख्या १५ झाली.

---

### गस्त घालणाऱ्या बोटींची बांधणी

कलकत्ता येथील गार्डन रीच कारखान्यात समुद्रावर गस्त घालण्यास उपयोगी पडणाऱ्या बोटी बांधण्यात येणार आहेत. समुद्रावरील वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी अशा बोटींची हिंदच्या नाविक दलाला आवश्यकता आहे. ह्या बोटी २०० टन वजनाच्या असतील. त्यांचे आराखडे नौदलानेच तयार केलेले आहेत. आराखड्याप्रमाणे बांधण्यात यावयाच्या ह्या बोटींवर संरक्षणाची अगदी आधुनिक साधने बसविण्यात येतील. त्याचप्रमाणे पाणबुडीपासून होणाऱ्या धोक्याला तोंड देण्याचीही साधने असतील. चोरट्या व्यापाराला विरोध करण्यास उपयुक्त ठरतील अशाही काही बोटी कारखान्यात बांधण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. त्यावरील यांत्रिक साधने अपयावत् नसतील; पण परिणामकारक असतील.

---

### गुन्ह्यांच्या बंदोबस्तासाठी वाढता खर्च

अमेरिकन सरकारच्या व्यापार खात्याला देशातील गुन्हेगारी विरुद्ध कराव्या लागणाऱ्या वाढत्या खर्चामुळे चिंता वाटू लागली आहे. गेल्या १० वर्षांत अमेरिकेच्या सरकारने आणि खाजगी रीतीने ह्यासाठी केलेल्या खर्चात तिपटीने वाढ झाली आहे. १९७० साली गुन्हेगारी विरुद्ध करण्यात आलेला खर्च १,०१० कोटी डॉलर्स अथवा ७ हजार कोटी रुपये इतका होता. ह्या खर्चात आणखीही एकसारखी वाढ होत आहे. गुन्हेगार नव्या-नव्या मार्गांनी गुन्हे करण्यात मग्न आहेत तर त्यांच्या कृत्यांवर नजर ठेवण्यासाठी सरकारही नव्या-नव्या कल्पना योजीत आहे. गुन्ह्यात मादक द्रव्याची चोरटी आयात व विक्री ह्या गुन्ह्याचे प्रमाण मोठे आहे. त्यात नफा खूप असतो.

---

## पदव्युत्तर अभ्यासकांना नोकऱ्या मिळणे कठीण

इंडिआ इंटरनॅशनल सेंटर ह्या संघटनेपुढे पदव्युत्तर अभ्यास आणि संशोधन ह्या विषयावर बोलताना डॉ. नायर ह्यांनी १९७१ च्या शिरगणतीचा आधार घेऊन सुशिक्षितांच्या बेकारीबद्दल विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की देशात नोकऱ्या देणे अगर मिळविणे अवघड झालेले आहे. तेव्हा स्वतःसाठी स्वतःच रोजगारी निर्माण करण्याचा एकच पर्याय उपलब्ध राहतो. पण ह्या बाबतीत येणारा अनुभव चांगला नाही. १९७१ च्या शिरगणतीत गोळा करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे असे म्हणता येईल की शैक्षणिक दर्जा जितका. जास्त तितके स्वतःच स्वतःला उद्योग लावून घेणे अवघड होऊन बसते. म्हणजे, जास्त शिक्षण ह्या बाबतीत निरुपयोगी ठरते. पदवी घेतलेल्या तरुणांत स्वतःचा रोजगार निर्माण करण्याचे जे प्रमाण आहे ते पदव्युत्तर अभ्यास करणाऱ्यात नाही; बरेच कमी आहे. स्वतःच स्वतःला उद्योग मिळविण्याबाबत वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर अभ्यासक मात्र पदवीधरांपेक्षा संख्येने अधिक आहेत. शिरगणतीमधील माहिती-प्रमाणे देशात ६ लाख तरुण पदव्युत्तर अभ्यासक्रमात गुंतलेले आहेत. त्यांपैकी ३ टक्के अभ्यासक शास्त्रीय विषयात संशोधन करीत आहेत; १० टक्के विद्यार्थी शेतीशी संबंधित संशोधन करीत आहेत. आश्चर्याची गोष्ट अशी की पदव्युत्तर विद्यार्थ्यांपैकी अनेक जणांना नोकरी करण्याची इच्छाही नाही. अशा पदवीधरांत बऱ्याच स्त्रिया आहेत.

---

## इस्राइलच्या शिक्षणक्रमात शेक्सपिअरला स्थान नाही

इस्राइलच्या शिक्षण खात्याने शालेय अभ्यासक्रमातून शेक्स-पिअरच्या नाटकातील भाषणांना अर्धचंद्र देण्याचे ठरविले आहे. खात्याच्या मताने हा जगत्‌विख्यात नाटककार आता कालबाह्य झालेला आहे. येत्या दोन वर्षांच्या अवधीत शेक्सपिअरच्या नाटकातील उताऱ्यांऐवजी आधुनिक ग्रंथकार आणि वृत्तपत्रे ह्यांमधील मजकुराला प्राधान्य देण्यात येणार आहे. शिक्षण-खात्याला असे आढळून आले आहे की शाळांतील मुले शेक्स-पिअरच्या नाटकातील अनेक भाग मुखोद्‌गत करून म्हणून दाखवू शकतात; परंतु एखाद्या विषयावर इंग्रजीत सहजपणे संवाद करणे मात्र त्यांना जमत नाही.

---

## लांब केसांच्या क्रिकेट खेळाडूंचे पासपोर्ट जप्त

ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांचा संयुक्त क्रिकेट संघ सिंगापूर येथील क्रिकेटसंघाशी सहा सामने खेळण्यासाठी १० जुलै रोजी विमानतळावर उतरला, तेव्हा त्यातील दोन खेळाडूंचा पासपोर्ट जप्त करण्यात आला. कारण, त्यांचे केस खूपच वाढलेले होते. "केस कापून या म्हणजे तुमचे पासपोर्ट परत करू" असे त्यांना सांगण्यात आले. त्याप्रमाणे त्या खेळाडूंनी केस कापून घेतले.

## परदेशातील हिंदी डॉक्टर्सबद्दल चौकशी

इंडिअन मेडिकल असोसिएशनला भारत सरकाने असे सुचविले आहे की संघटनेने परदेशात काम करीत असलेल्या हिंदी डॉक्टरांच्या व्यवसायविषयक परिस्थितीची पाहाणी करावी. अमेरिका, ब्रिटन आणि कॅनडा ह्या देशांतून अनेक हिंदी डॉक्टर्स काम करीत आहेत. अनेक तरुण डॉक्टर्स उच्च शिक्षण घेण्यासाठी अगर संशोधन करण्यासाठी परदेशी जातात. बरेच डॉक्टर्स तेथील आरामी जीवनाला मोहून तेथेच राहातात. पण अलीकडे परदेशात स्थायिक झालेल्या डॉक्टर्सना योग्य रीतीने वागविण्यात येत नाही अशा तक्रारी येऊ लागल्या आहेत. म्हणून भारत सरकारने पाहाणीची सूचना केली आहे.

---

## गंगेचे पाणी राजस्थानकडे वळविणार

राजस्थानमधील अलवार, बिकानेर, गंगासागर इत्यादी पाच जिल्हे नेहमीच कमी जास्त प्रमाणात अवर्षणग्रस्त असतात. ह्या जिल्ह्यांना गंगेच्या पुराचे पाणी देण्याच्या योजनेचा विचार करण्यात येत आहे. गंगा पूरनियंत्रण बोर्डाची बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली असताना योजनेची पहाणी करण्यात आली. तांत्रिक दृष्ट्या योग्य वाटली तर ती हाती घेण्यात येईल. योजना अमलात आणण्यासाठी ५२२ मैल लांबीचा एक कालवा खोदावा लागेल. अलिगड शहरानजीक असलेल्या नरोला ह्या जलकेंद्रापासून ह्या कालव्याला प्रारंभ करावा लागेल. शेतीसाठी पाणीपुरवठा करणारी ही एक मोठी योजना ठरेल.

---

## आहारदृष्ट्या अधिक चांगल्या अंड्यांची निर्मिती

ऑस्ट्रेलिआमधील शास्त्रज्ञांनी आहारदृष्ट्या अधिक चांगली अंडी निर्माण करण्यात यश मिळविले आहे. वरून दिसायला ही अंडी कोंबडीपासून मिळणाऱ्या नेहमीच्या अंड्यांसारखीच दिसतात. परंतु त्यात अधिक 'ई' जीवनसत्त्व असते आणि त्यांतील चरबीयुक्त घटक कमी सकस असतात. कोंबड्यांना घालण्यात येणारा निवडक शाकाहारी आहार नवीन प्रकारच्या अंड्यांचे रहस्य आहे. आहारदृष्ट्या पचण्याला सोपे पण सकस अन्नपदार्थ निर्माण करण्याचे प्रयत्न जगभर करण्यात येत आहेत. हृदय विकारासारख्या काही रोगांत रोग्याला सकस पण पचण्यास हलके अन्न उपयुक्त ठरते. अशा रोग्यांची ह्या अंड्यांमुळे चांगली सोय झाली आहे.

---

**कस्तुरी मृगांसाठी अभयारण्य** – जम्मू व काश्मीरमधील जंगलात कस्तुरी मृगांची जोपासना करण्यासाठी अभयारण्यांची स्थापना करण्यात येत आहे. कस्तुरीसारखी अप्रतिम सुगंधी वस्तु देणाऱ्या ह्या मृगांची संख्या राज्यांतील अरण्यात सुमारे २ हजार ते ३ हजार असावी.

## सिमेंटचे नवे कारखाने आणि जुन्यांचा विस्तार

हिंदमधील सिमेंटचा पुरवठा वाढविण्यासाठी भारत सरकारने काही नवे कारखाने काढण्याचे आणि जुन्या कारखान्यांचा विस्तार करण्याचे ठरविले आहे अशी माहिती राज्यसभेत देण्यात आली. नवे कारखाने उभारून ७० लाख टन अधिक सिमेंट उत्पादन करण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. सध्या भारतामधील सिमेंटच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता दरसाल १·९५ कोटी टनाची आहे. १९७१ मध्ये देशात १·४९ कोटी टन सिमेंट निर्माण करण्यात आले. कोठेही मोठ्या प्रमाणावर टंचाई भासल्याच्या तक्रारी आल्या नाहीत. एक-दोन कारखान्यांना कोळशाचा तुटवडा पडल्यामुळे तेथील उत्पादनात थोडा खंड पडला. एरव्ही सर्व कारखान्यांतून उत्पादन नीट चालू होते. नव्या कारखान्यांना परवाने देताना निरनिराळ्या भागांचा विचार करण्यात आला आहे. सिमेंटच्या उत्पादन-केंद्रापासून खपांची केंद्रे फार दूर असल्यास वाहतुकीचा खर्च वाढतो आणि कृत्रिम टंचाई निर्माण होण्याची शक्यता असते. ही परिस्थिती लक्षात घेऊन नव्या कारखान्यांची ठिकाणे निवडण्याची दक्षता घेण्यात आली आहे. सिमेंटची वाहतूक अवजड असते. त्यासाठी फक्त रेल्वेमार्गाचा उपयोग पुरा पडत नाही. म्हणून रस्त्यावरील वाहतुकीलाही उत्तेजन देण्यात येत आहे. त्याचबरोबर रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी वाहतुकीसाठी वाघिणी तत्परतेने पुरवाव्या म्हणून प्रयत्न करण्यात येत आहे. किनाऱ्याजवळील वाहतूक करणाऱ्या बोटींचा अधिक वापर करता येईल काय, ह्याचाही विचार चालू आहे. रेल्वे व रस्ता वाहतूक ह्यांची नीट सांगड घालण्याचीही खटपट करण्यात येत आहे.

## नियोजनात जनतेला महत्त्वाचे स्थान

पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाची लोकांना नीट माहिती व्हावी म्हणून प्रसिद्धीची व्यवस्था पाहण्यासाठी नियोजन समितीने एक मार्गदर्शन समिती स्थापन केली आहे. ह्या समितीच्या पहिल्या बैठकीत बोलताना नियोजनमंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम् म्हणाले की पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात सामाजिक आर्थिक बदल घडविण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. देशातील लोकांनी ह्या धोरणाचे स्वागत करावे म्हणून लोकमत तयार करण्यात आले पाहिजे. कार्यक्रमात नमूद केलेल्या साध्याबद्दल सर्वांना फार तळमळ वाटली पाहिजे. निरक्षरता नाहीशी झाली पाहिजे. घरे, शहरे आणि रस्ते स्वच्छ राखण्यात आले पाहिजेत, अपुरा आहार व रोग ह्यांना देशात वाव नसला पाहिजे, लोकांनी आपली मुले शाळेत पाठविली पाहिजेत, ह्या व इतर बाबींबद्दल सर्वांना मनापासून कळकळ वाटली पाहिजे तशी ती वाटली नाही तर आर्थिक कार्यक्रम यशस्वी होणार नाही. सध्या देशातील गरिबीमुळे बरीच राजकीय व सामाजिक अस्वस्थता निर्माण झालेली आहे. परंतु गरिबी दूर करण्यासाठी आवश्यक असणारे उपयोग योजण्यासंबंधी मात्र फारशी तयारी दिसत नाही. आज जे काहीशा सुस्थितीत आहेत त्यांनी स्वतःला मिळणारा आराम कमी करावा म्हणून त्यांचे मन वळविण्यात आले पाहिजे. त्यांना मिळणाऱ्या काही फायद्यांवर पाणी सोडण्यास तयार झाले पाहिजे, जनतासंपर्काची आधुनिक साधने वापरून आहार, कुटुंब नियोजन, अधिक धान्यनिर्मिती ह्याबद्दल लोकांना शहाणे केले पाहिजे.

## पाकिस्तानी युद्धकैद्यांची वजने वाढली

बांगला देशावरून झालेल्या युद्धात भारताने पकडलेल्या युद्धकैद्यांना चांगलेच आरामात ठेवण्यात येत आहे. युद्धकैद्यांमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांना उन्हाळ्याच्या दिवसात हवा थंड राखण्याची यंत्रे देण्यात आली होती. शिवाय इतर कैद्यांसाठी थंड पाणी देणारी यंत्रे देण्यात आली होती. पाकिस्तानी युद्धकैद्यांवर ह्या आदरातिथ्याचा भलताच परिणाम झाला. त्यांनी छावण्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांकडे अर्ज करून आइस्क्रीम बनविण्याची भांडी बसविण्याची मागणी केली. ह्या आरामशीर जीवनाचा परिणाम होऊन बहुतेक युद्धकैद्यांची वजने २ ते ३ किलोग्रॅमपर्यंत वाढलेली दिसून आली.

## विलासी हॉटेल्सवर बंगालमध्ये करवाढ

पश्चिम बंगाल सरकारने चैनबाज विलासी हॉटेल्स व कॅबेरे सारखी नृत्ये दाखविणाऱ्या रेस्टॉरांवर आकारल्या जाणाऱ्या करात वाढ केली आहे सुखद वातावरणात, आरामशीर आसनात बसून चैन करणाऱ्या ग्राहकांकडून आता अधिक कर घेण्यात येईल. कारण अशा हॉटेल्सचे चालक तो त्यांच्या माथी मारतील. विलासी करमणुकीसाठी येणाऱ्या ग्राहकांना आता एकूण बिलावर १० टक्के अधिक पैसे द्यावे लागतील. ह्या बिलात प्रवेश फी, अन्नाचे पैसे, मदिरा इत्यादी सर्व बाबींचा समावेश करून मग ज्यादा आकार घेण्यात येईल. चैनबाजी चालविणारी हॉटेल्स व रेस्टॉरांच्या प्रत्येकी १०० चौरस मीटर जागेवर दरसाल १०० रुपये कर आता द्यावा लागणार आहे.

## गीर अरण्यातील सिंहांचे संरक्षण

सौराष्ट्रातील गीरच्या जंगलात सिंहांसाठी अभयारण्य स्थापन करण्यात आलेले आहे. परंतु त्या अरण्यात असलेले सिंह भक्ष्य शोधण्यासाठी जवळपासच्या खेड्यात येतात आणि गुरेढोरे मारतात. त्यामुळे खेड्यातील लोक विषप्रयोग करून सिंहांना मारतात. अर्थातच आशिया खंडात फक्त येथेच नोंदणाऱ्या सिंहांची संख्या कमी होत चालली. १९६३ मध्ये २८५ सिंहांची नोंद करण्यात आली होती. पांच वर्षांनंतर अवघी १७७ जनावरे शिल्लक राहिलेली दिसली. आता अभयारण्याभोवती १७६ किलोमीटर लांबीची भिंत बांधण्यात येत आहे. त्यापैकी १७ किलोमीटर लांबीची भिंत पुरी झाली आहे. अरण्यात सिंहांसाठी डुकरांची पैदास करण्यात येत आहे.

# अमेरिकनांचे ज्योतिषवेड !

**ज्योतिषवेडाबद्दल भारतीयांना नावे ठेवणाऱ्या अमेरिकनांचे स्वतःचे ज्योतिषवेड पाहा !**

**( डॉ. दिलीप पेंडसे )**

आतापर्यंत १० अॅस्ट्रोनॉटस्‌ना चंद्रावर पाठवून त्यांना परत आणण्यात ज्या राष्ट्राने असामान्य शास्त्रीय प्रगती केली त्याच देशातील २५ टक्के लोक भविष्यावर विश्वास ठेवतात.

सध्या अमेरिकेत प्रसिद्ध होणाऱ्या सुमारे १७५० वर्तमानपत्रांपैकी ७० टक्के वर्तमानपत्रे दररोजची राशिभविष्ये प्रसिद्ध करतात! अशा भविष्याचा भक्तगण ५ कोटीपर्यंत जातो. म्हणजे अमेरिकेच्या एकूण लोकसंख्येच्या २५ टक्के लोक! वर्तमानपत्रांतील भविष्यावरून दिवस वा आठवडा कसा जाईल या विवंचनेत लाखो लोक पडलेले असतात. वर्तमानपत्रांप्रमाणेच साप्ताहिके, पाक्षिके व मासिके सुद्धा भविष्यावरचे लेख प्रसिद्ध करतात. खास स्त्रियांकरिता वाहिलेल्या मासिकांत तर राशिभविष्य हमखास आढळते. केवळ भविष्याला वाहिलेली अनेक मासिके व साप्ताहिके अमेरिकेत भरपूर आहेत व दिवसेंदिवस त्यात नवीन मासिकांची भर पडत आहे. राशिभविष्यावरील पुस्तकांनाही भरपूर मागणी असते. १९७० मध्ये राशिभविष्यावरील केवळ एका पुस्तकाच्या ८० लाख प्रती खपल्या होत्या.

हात, चेहरा किंवा कुंडली पाहून भविष्य वर्तवणे हा सुमारे दहा हजार अमेरिकनांचा उपजीविकेचा धंदा आहे. नोकरी वा इतर व्यवसाय करून इतर वेळात भविष्य सांगून पैसा कमावणारे सुमारे दोन लाख ज्योतिषी या देशात आहेत. ज्योतिष सांगणाऱ्यांच्या विविध संघटना अस्तित्वात असून त्यात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांची संख्याही मोठी आहे. जीन डिक्सन या स्त्रीने भविष्य वर्तवणाऱ्यात खूप नाव कमावले आहे. तिचे लेख अनेक मासिकांत प्रसिद्ध होतात. जीनप्रमाणेच लिंडा गुडमन्, पॉलीन मेसिना या स्त्रियांनी खूप नाव कमावलंय. पुरुषांत अॅल मॅरिसन्, कीथ क्लेटन्, व लॉइड कोप ही नावे प्रसिद्ध आहेत.

अमेरिकेतील भविष्यवाले अफाट कमाई करतात. कित्येकजणांची कमाई डॉक्टरांपेक्षाही जास्त असते ! ज्योतिष सांगणाऱ्यांचे दर भरमसाट असतात. लिंडा गुडमन् तोंडी भविष्य सांगायला कमीत कमी २०० डॉलर्स दर लावते तर लेखी भविष्याकरता ५०० डॉलर्स उपटते ! अर्थातच ज्योतिषांचे दरांत ५ डॉलर्सपासून ५०० डॉलर्सपर्यंत चढउतार होऊ शकतो. हल्ली कॉम्प्युटरचे साहाय्याने भविष्य वर्तवण्याची व्यवस्था झालीय. कॉम्प्युटरला जन्मवेळ, जन्म-दिन व इतर काही माहिती पुरवली की ६० सेकंदात, टाईप केलेले २० पानी भविष्य कॉम्प्युटर गिऱ्हाइकाचे हातात देतो ! कॉम्प्युटरचे साहाय्याने भविष्य मिळवायला खर्च येतो फक्त २० डॉलर्स ! अशाच तऱ्हेने एका कागदावर सही करून दिल्यास, कॉम्प्युटर गिऱ्हाइकाचे स्वभाव विशेष ओळखतो. त्याला वेळ लागतो १ मिनिट व खर्च येतो फक्त ७५ सेंटस् !

भविष्य समजावून घेणाऱ्यांच्या वाढत्या संख्येमुळे पूरक उद्योगधंद्यांना चलती आलीय. राशींची चिन्हे असलेले टाईज, टायपिन्स, नेकलेस, पुस्तकांवरील वेष्टणे, उशांवरील अभ्रे, हातरुमाल, स्कार्फ, चहा-कॉफी पिण्याचे कप्स, वगैरे अनेक गोष्टी दुकानात मिळतात. भविष्य सांगणाऱ्या रेकॉर्डसही बाजारात मिळू शकतात. कित्येक रेडिओ-केंद्रांवर राशिभविष्य दररोज सांगितले जाते. जीन डिक्सनचा भविष्य वर्तवण्याचा कार्यक्रम टीव्हीवर पाहायला मिळतो. जाणकारांच्या अंदाजाप्रमाणे दरवर्षी सुमारे २० कोटी डॉलर्सची उलाढाल ज्योतिष व पूरक उद्योगधंद्यात होते !

दररोज भविष्य अगाऊ समजून घ्यायची चटक काहींना इतकी असते की, भविष्य कळल्याशिवाय ते घराबाहेर पाऊल टाकीत नाहीत. काहीजण त्यांच्या ठराविक ज्योतिषांना दररोज फोन करून भविष्य विचारतात. फोन आला की भविष्यवाले गोड आवाजात उत्तर देतात 'गुड मॉर्निंग कन्या ! आज मोटर घेऊन जाऊ नका. अपघात होण्याची शक्यता जास्त आहे.' असे भविष्य ऐकल्यावर कन्या राशीचे गिऱ्हाईक मोटार घेऊन जायची काय बिशाद आहे ! विवाहाला आसुसलेल्या तरुणीला जर सांगितले की, 'आजचा दिवस सबुरीने घ्या, प्रियकराचे मन तोडू नका, तुमचे भविष्य त्याचे हातात आहे !' तर ती तरुणी प्रियकर जे मागेल ते द्यायला तयार होते ! एखाद्या धंदेवाईकाने भविष्य समजावून घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला कदाचित उत्तर मिळेल, 'नमस्ते धनु. आजचा दिवस चांगला आहे. कोणत्याही करारावर सह्या केल्या तरी चालतील. पण शक्यतो सर्व व्यवहार दुपारच्या आत उरका' तो धंदेवाईक लगेच धावपळ करून दुपारच्या आत सर्व कारभार उरकेल !

सर्व थरांतील लोकांना भविष्याचे आकर्षण असले तरी तरुण स्त्रियांना त्याचे आकर्षण फार. विशेषतः प्रेमात पडलेल्या स्त्रिया भविष्यावर फार विश्वास ठेवतात. विवाहाच्या तारखा त्या ज्योतिषाला विचारूनच पक्क्या करतात. उद्योगधंद्यांत गुरफटलेल्यांनाही भविष्याचे औत्सुक्य असते. काही मोठ्या कंपन्या पगारी ज्योतिषी नोकरीवर ठेवतात. शेअर बाजारात लाखो डॉलर्सची उलाढाल करणारा एक ब्रोकर बरोबर तीनच्या ठोक्याला खरेदी-विक्रीचे व्यवहार करतो. कारण त्याच्या ज्योतिषाने त्याला सांगितलंय् की, तीन आकडा भाग्यवान आहे ! हॉलिवूडच्या नटनट्यांना राशिभविष्याचे वेड फार असते. विवाहाची ओढ, धंद्यातील चढउतार, प्रसिद्धीची हाव, अपघाताची भीती, नोकरीतील अशाश्वती, अपत्यांची जबाबदारी, आजारपण वगैरे, अनेक कारणांकरिता येथील लोक ज्योतिषाचे कचेरीत पाऊल टाकतात. सर्व प्रकारच्या कटकटीतून सुटका केव्हा होईल हे समजावून घ्यायची ओढ प्रत्येकाला असतेच. अर्थातच तेथील ज्योतिषांत अनेकजण बंडलबाज असतात. गोड भाषेत बोलून ते गिऱ्हाईकाला बनवतात.

—कथालक्ष्मी, जून, १९७२

### दररोज ८० हजार अंड्यांचा निर्यात

अजमीर शहराच्या परिसरांत कोंबडी पाळण्याच्या धंद्याने चांगलेच बस्तान बसविले आहे. सातच वर्षांपूर्वी अजमीर शहराची मागणी पुरविण्यासाठी रोज ३ ते ४ हजार अंडी बाहेरून आणावी लागत असत. तेच अजमीर आता दररोज ८० हजार अंडी बाहेर पाठवू लागले आहे. ह्या भागात १९६४ पूर्वी कोंबडी पाळण्याचा धंदा एक विशिष्ट जमात छोटा उद्योगधंदा म्हणून करीत असे. १९५६ साली या धंद्याची शास्त्रीय पद्धतीने जोपासना करण्यासाठी राज्य सरकारने एक विकास गट स्थापन केला. हा धंदा करणाऱ्यांना तांत्रिक ज्ञान देण्याची सोय करण्यात आली. त्याचप्रमाणे त्यांना कर्ज व मदत अशा दोन्ही मार्गांनी आर्थिक साह्यही देण्यात आले. त्याचा चांगला फायदा झाला.

---

### आता कागदाच्या दुधाच्या पिशव्या

इंडिअन डेअरी कॉर्पोरेशन आता दुधाच्या पिशव्या वापरून ग्राहकांना दूध पुरविण्याची तयारी करीत आहे. ह्या कामी एका स्वीडिश कंपनीचे साह्य घेण्यात येत आहे. अशा प्रकारच्या पिशव्या तयार करण्याच्या योजनेला मंजुरी मिळाली असून परदेशी गुंतवणूक मंडळाने तिला संमती दिली आहे. स्वीडिश कंपनीच्या सहकार्याने बनविण्यात येणाऱ्या ह्या कागदी पिशव्यातील दूध १५ दिवसपर्यंत न नासता टिकू शकते. मात्र काचेच्या बाटल्यांत भरलेल्या दुधापेक्षा त्याची किंमत २० पैशांनी अधिक असेल. नव्या पिशव्यांमुळे दुधाचे वाटप फारच सुलभ होईल.

---

### मोठ्या शहरातील दुधाच्या पुरवठ्यात वाढ

मनुष्याच्या आहारात दुधाला असणारे महत्त्वाचे स्थान सर्वांना माहीत आहे. भारतामधील बहुसंख्य नागरिकांना समतोल आहारासाठी अधिक दुधाची आवश्यकता आहे. पण परिस्थिती मात्र बिकट आहे. सध्या दर माणसामागे फक्त १०८ ग्रॅम दुधाचा पुरवठा होऊ शकतो; आणि तोही दुधपुरवठा योजना ज्या मोठ्या शहरातून चालू आहेत त्यातच होतो. भारत सरकारचे शेतीखात्याचे राज्यमंत्री श्री. शेरसिंग ह्यांनी दुधपुरवठा लवकरच वाढविण्याच्या सरकारच्या उपायांची माहिती दिल्ली येथे पत्रकारांना दिली. ते म्हणाले की सध्या दुधाचे उत्पादन २.२५ कोटी टन होते. ते ५ कोटी टनांपर्यंत वाढविण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. दुभत्या जनावरांचा संकर करून अधिक दूध देणाऱ्या जनावरांची पैदास करण्यास उत्तेजन देण्यात येत आहे. पण अशी जनावरे पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊन दुधाचा पुरवठा वाढण्यास २–३ वर्षांचा तरी अवधी लागेल. दरम्यान दिल्ली, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ह्या मोठ्या शहरांना दुधाचा अधिक पुरवठा व्हावा म्हणून खटपट करण्यात येत आहे. ज्या मोठ्या शहरांतून सरकारी मालकीचे गौळीवाडे आहेत त्यातून दुधाचा अधिक पुरवठा करण्यात येणार आहे. येत्या सहा महिन्यांत हे काम पूर्ण होईल असा अंदाज आहे. सध्या ह्या शहरांतून रोज १० लाख लिटर दूध ग्राहकांना देण्यात येते. त्यात ३५ टक्के वाढ करण्याचा सरकारचा इरादा आहे.


# ओगले

## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी ( जि. सातारा )

---




उत्पादक –

भिडे अँन्ड सन्स.प्रा.लि.सांगली

महाराष्ट्र राज्य.

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



[illegible] ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१९, अपोलो स्ट्रीट, मुंबई—१.



Madison/TGM17 Mar

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)